15

आदिवासी साहित्य, संस्कृती आणि अस्मितेचे प्रतीक

ISSN 2319-6033

१५ फेब्रुवारी / मार्च २०२२


वर्ष-१५ वे, अंक ३-४

किंमत रू. ४०/-

पृष्ठे - ४०

# फडकी

(मासिक)




संपादक :- सुनील फलके । कृष्णा साबळे

मुख्य संपादक –
डॉ. संजय लोहकरे

सहसंपादक –
प्रा.डॉ.तुकाराम रोंगटे डॉ. मारूती आढळ

उप संपादक –
डॉ. सोनू लांडे डॉ. मधुचंद्र भुसारे

कार्यकारी संपादक –
मा. संजय इदे डॉ. सुनील घनकुटे

प्रसिद्धी –
देवराम आढळ सुनील फलके
पंकज इरनक प्रा. रामदास गिळंदे

संपादक मंडळ –
तुकाराम धांडे कृष्णा साबळे
कैलास धिंदळे देवदत्त चौधरी
अभिजित करवंदे सीता भोजने
मेजर विठ्ठल बांगर रोहिदास डगळे
रोशन जांबू अभिमन्यू दारशिंबे
डॉ. विष्णू बोरसे

अक्षरजुळवणी –
सरिता ग्राफिक्स ॲण्ड प्रिंटर्स,
अमरावती

प्रकाशन स्थळ / पत्र व्यवहार –
संपादक – डॉ. संजय यशवंत लोहकरे
निरगुडेवाडी (विठे) ४२२ ६०४
ता. अकोले, जि.अहमदनगर
संपर्क: ९६५७५४९०७६, ९४०४९७९६८३
ई–मेल : phadki@rediffmail.com

(मासिकातील लेखांशी संपादक सहमत असेलच असे नाही)

## अनुक्रमणिका


- आदिवासी साहित्य : वास्तव आणि दिशा
  डॉ. मनोज तायडे ०३
- आदिवासी साहित्य : साठोत्तरी प्रवाहातील लक्षवेधी साहित्य
  रंजना रामदास वडेकर ०८
- 'राब' कथासंग्रहातील मिथकदृष्टी
  प्रा. यशवंत ढवळा भांडकोळी १२
- अन्याय अत्याचाराच्या मुक्तीची लढाऊ कविता : तहबंदी
  प्रा. डॉ. जनार्दन काटकर २७
- पाचला पाच कमी
  झेनेप इन्सी ओरल / डॉ. धनंजय देवळालकर ३५
- तुला स्वत:ला सिद्ध करायचंय! (कविता)
  स्मिता सतीश माळेदे ३९

**वर्गणीचे दर**

वार्षिक:- ३०० रू., दशवार्षिक:- २५०० रू.,
आजिव :- ५००० रू.
संपादकीय पत्त्यावर मनी ऑर्डर, चेक
किंवा डिमांड ड्राफ्टने वर्गणी पाठवावी.
'फडकी' (Fadaki) या नावाने चेक / डिमांड ड्राफ्ट असावा.
बँक ट्रान्स्फरने वर्गणी भरण्यासाठी तपशील
बँक ऑफ महाराष्ट्र शाखा, अकोले, जि. अहमदनगर
बचत खात्याचे नाव :- फडकी (Fadaki)
बचत खाते क्र. :- ६०३०७९६६८५४
IFSC Code :- MAHB०००१६४१
MICR No. :- ४२२०१४५०२

# 'राब' कथासंग्रहातील मिथकदृष्टी

प्रा. यशवंत ढवळा भांडकोळी, प्रमुख, मराठी विभाग,
शेठ. ज. नौ. पालीवाला महाविद्यालय, पाली, ता. सुधागड, जि. रायगड. भ्रमनध्वनी :- ९४२०९६४६७२




**'मिथक' संकल्पना व स्वरूप :-**

**मौ**खिक वाङ्मयातून लोकसाहित्याची निर्मिती झाली आहे. तो अज्ञात अशा लोकसाहित्याचा आविष्कार आहे. लोकसाहित्यातून लोककथा, लोकगीते, लोकसंगीत, लोकनृत्य, लोककला इ. त्याबरोबरच रूढी, परंपरा, आचार-विचार, श्रध्दा, लोकसमजुती, उखाणी, आहाणी, कोहडी, म्हणी, वाक्प्रचार अशी त्याची व्याप्ती मोठी आहे. यातील अनेक गीते, आहाणी, नृत्य विशिष्ट प्रसंगी सादर केली जातात. त्याप्रसंगी विशिष्ट विधी केले जातात. यातून संस्कृतीची अनेक अंगे प्रतिबिंबीत होतात. 'मिथकांची निर्मिती मानवी संस्कृतीच्या विकासाच्या दुसऱ्या टप्प्यावर झाली असे म्हटले जाते. माणसाला भाषेचा शोध लागला आणि त्यामुळे तो निसर्गाची गुढे उकलू लागला, त्यांचा अन्वयार्थ लावू लागला. संस्कृती विकासाच्या ह्या दुसऱ्या टप्प्यात भाषेच्या साधनामुळे माणसाने आदिमानवाच्या प्रारंभीचा प्राकृतिक टप्पा ओलांडला आणि त्याने सृष्टीतील विविध घटितांचा अन्वय लावला. त्यातून मिथकांची निर्मिती झाली आहे. इथे सृष्टीतील घटित आणि त्याचा अनुभव घेण्याची पध्दती ह्या दोहोंतून मिथक जन्मले, हे स्पष्ट होते. मानवेतिहासाच्या प्रारंभीच्या काळातील इतिहास हा मिथकांच्या माध्यमांतून उलगडता येतो.'[१]

Myth या इंग्रजी संज्ञेसाठी मराठीत पर्यायी संज्ञा म्हणून 'मिथक' संज्ञा वापरण्यात आलेली दिसून येते. 'मुथॉस' या ग्रीक शब्दापासून इंग्रजी 'मिथ' हा शब्द बनला आहे. मुथॉस म्हणजे कथा असा अर्थ या संज्ञेचा होतो. या संज्ञेची व्याप्ती फार मोठी आहे. तिला देश, काल यांच्या मर्यादा नसतात. आदिमानवाला आपल्या अवतीभोवतीच्या घटनांचा, चमत्कारांचा अन्वयार्थ लागत नव्हता, गुढांचे आकलन होत नव्हते. त्यातून त्याच्या मनामध्ये भय निर्माण होत होते. त्यामुळे अनेक देवदेवता, राक्षस, भूतपिशाच यांच्याविषयीच्या



Sheth J. N. P. Arts Sci. & Com. College, Pali ★ Est.: June-1989 Dist. Raigad. Sudhagad

ISSN- 2319-6033 फडकी

कपोलकल्पित कथा रचल्या गेल्या. अशा कथांतून त्यांच्या मनाचे समाधान होत असावे. अशा मानवी जीवनाच्या पूर्वजन्मीच्या खुणा या मिथकांमधून मांडल्या गेल्या आहेत. या अनुषंगानेच पूजाविधी आले आहेत. हा एक त्या संस्कृतीचा भाग आहे. म्हणून ही मिथके परंपरेतून आलेली, परंपरेत रूजलेली असतात. यामधून लोकमानस, लोकभावना, लोकसमजुती, लोकश्रध्दा यांचा प्रभाव प्रामुख्याने दिसून येतो. मानवी मनाला उन्नत करण्याचे सामर्थ्य मिथकांमध्ये असते.

'आदिवासी जमातीत मौखिक परंपरेने आलेली अनेक मिथके आहेत. ही मिथके एका पिढीकडून दुसऱ्या पिढीकडे संक्रमित होत असतात. त्यांच्यामध्ये प्रदेशानुरूप व काळानुरूप बदल होत असतो. त्यांच्यामधून मानवी जीवनाशी निगडित चित्रण होत असते. या चित्रणात आदिम भावना, विश्वनिर्मिती, विश्वाचे नियंत्रण करणारी शक्ती आणि तिच्याबदल असणारे कुतूहल, भीती, आदर आणि त्यातून निर्माण होणारी श्रध्दा, समजूती, उपासना, रूढी, परंपरा, आचार-विचार या सर्व गोष्टी चित्रित होत असतात. आदिवासी लोकसाहित्यातील लोककथांमधून दैवतविषयक, प्राणीविषयक, माणसांच्या उत्पतीविषयक, सृष्टीविषयक, प्राणी आणि माणूस यांच्यातील नात्याविषयक, पशुपक्षांच्या कामाचे कौतूक आणि कुतूहल सांगणाऱ्या कथा येतात, त्या 'मिथककथा' म्हणूनच'.[२] इतकेच नव्हे तर आदिम मानवाने चंद्र, सूर्य, वृक्षवल्ली आणि निर्जीव वस्तू यांनाही सजीव आणि चैतन्यमय मानले.

**'राब' कथासंग्रहातील मिथकदृष्टी**

संजय लोहकरे हे आदिवासी साहित्यातील एक महत्त्वाचे लेखक आहेत. त्यांचा 'राब' हा कथासंग्रह ९ ऑगस्ट २०१८ साली प्रसिध्द झाला आहे. अथर्व पब्लिकेशन, जळगाव यांनी हा कथासंग्रह प्रसिध्द केला आहे. या कथासंग्रहात एकूण पंधरा कथा आणि १३६ पृष्ठांचा हा कथासंग्रह असून त्याचे मूल्य १७५/- इतके आहे. या कथासंग्रहाला डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, औरंगाबाद येथील प्रमुख, मराठी विभाग प्रा. डॉ. सतीश बडवे यांची प्रस्तावना लाभली आहे. संजय लोहकरे यांनी संपूर्ण कथासंग्रह डांगाणी बोलीभाषेत लिहिला आहे. त्यामुळे त्याला एक आशयघनता प्राप्त झाली आहे. या कथासंग्रहात प्रादेशिकतेचे सिमोल्लंघन झाले आहे. चाळीसगाव डांगाण, सातपुडा पर्वतरांगातील मेळघाट आणि ठाणे जिल्ह्याचा प्रदेश ही या कथासंग्रहाची प्रादेशिकता आहे.

या कथासंग्रहातून लेखकाने आदिवासी समाजाचे भावविश्व उभे केले आहे. आदिवासी समाजाचं कृषीविषयक जीवन, कलाविषयक जीवन, निसर्ग, संस्कृती, राजकारण, आदिवासींचे समूह जीवन, आदिवासी स्त्रियांचे स्वातंत्र्य, कुपोषण, सणउत्सव आणि त्यानुषंगाने येणारे प्रसंगानुरूप पूजाविधी येतात. आदिवासी समाजाची निसर्गावर श्रध्दा आहे. निसर्ग आणि आदिवासी यांचे नाते घनिष्ट आहे. त्यांना माहीत आहे की निसर्गावर वर्चस्व मिळवून, त्याला ओरबडून सुखशांती मिळणार नाही. म्हणून तो कायम निसर्गाचा समतोल राखण्यासाठी प्रयत्नशील असतो. निसर्गाचे रक्षण, जतन आणि संवर्धन करण्यासाठी दक्ष असतो. आदिवासींना कलेचे ज्ञान आपल्या पूर्वजांकडून मिळालेले असते. आपल्या स्वार्थापोटी राज्यकर्त्यांचे राजकीय डावपेच आदिवासींच्या मुळावर उठतात आणि अनेक निरपराध आदिवासींचा बळी जातो. अशी काही आशयसूत्रे या कथासंग्रहातून आली आहेत. वास्तविक, आदिवासी समाजात भगताला महत्त्वाचे स्थान आहे. आपल्या कुलदैवतांवर आदिवासी समाजाची श्रध्दा आहे. दरवर्षी

 ISSN- 2319-6033 फडकी

ते या देवदैवतांची पूजाविधी करतात. त्यांना प्रसंगानुरूप नैवेद्य पाणी करतात. त्यांच्या जत्राखेत्रा करतात. नवस, वटीभराण, जानी कबूल करतात, शेरणी वाटतात. आपल्या मनातील इच्छापूर्तीच्या निमित्ताने असे उत्सव साजरे करतात. या संदर्भात आदिवासी साहित्याचे ज्येष्ठ विचारवंत डॉ. गोविंद गारे म्हणतात की, ''आदिवासींच्या सर्व देवता कोपिष्ट असतात. त्यांच्या कोपामुळे मनुष्यावर नेहमी रोगराई, मृत्यू तसेच आपत्ती कोसळतात, म्हणून त्यांची पूजा करून त्यांना दारू, ताडी, कोंबडी, बकरे यांचा बळी देऊन नेहमी संतुष्ट ठेवले पाहिजे असा आदिवासींचा समज आहे.''[३] आदिवासी समाज हा साधाभोळा आहे. आशिक्षित आहे. आपल्या पूर्वजांनी सांगितलेल्या रीतिरिवाजाप्रमाणे आपले दैनंदिन व्यवहार पार पाडत असतो. म्हणून तो हे सर्व करत असतो. त्यातूनच मिथक निर्मिती होते. या अनुषंगाने मी या कथासंग्रहातून मिथके शोधण्याचा प्रयत्न केला आहे. तो किती यशस्वी झाला ते मी वाचकांवर सोडतो.

'राब' कथासंग्रहातील मिथकदृष्टीचा अभ्यास करताना अभ्यासाच्या सोयीसाठी त्यांची वर्गवारी करणे सोयीची ठेल. ती खालीलप्रमाणे:-

१) देवदैवतविषयक मिथके, २) सण-उत्सवाची मिथके, ३) कणसरी मातेचे मिथक, ४) वीर पुरूषांची मिथके, ५) प्राणी, पशु-पक्षीविषयक मिथके, ६) कलाविषयक मिथके, ७) डोंगर आणि निसर्ग संपत्तीविषयक मिथके

**१. देवदैवतविषयक मिथके:-**

आदिवासी समाज हा साधाभोळा असून अशिक्षित आहे. तो डोंगरदऱ्यांमध्ये राहणारा आहे. हा आदिवासी निसर्गाच्या सान्निध्यात स्वच्छंदी जीवन जगत आहे. पिढ्यान्‌पिढ्या आपल्या पारंपरिक देवदैवतांवर श्रध्दा, विश्वास ठेवून दैनंदिन जीवन जगत असतो. आपले दैनंदिन व्यवहार देखील या देवदैवतांच्या कृपाशीर्वादामुळे पूर्णत्वास जातात असा त्यांचा समज आहे. त्यामुळे माणसाचे जीवन सुखाचे होते, असे ते समजत असतात. घरातले विघ्न दूर होण्यासाठी व जंगलात सतत भटकंती करत असल्याने कोणतेही संकट येऊ नये यासाठी ते या देवदैवतांचे विधी करत असतात. दरवर्षी निरनिराळ्या ग्रामदैवतांची व पांढरीतील देवदैवतांच्या नावाने जत्रा भरविल्या जातात. या दिवशी लोक देवाजवळ नवस बोलतात. त्यांचबरोबर आपल्या मनातील इच्छा, आकांक्षा पूर्ण होण्यासाठी देवाजवळ गाऱ्हाणे मांडून कौल घेतात व नवस बोलतात. तो नवसाला पावला की लोक उत्साहाने त्याचा नवस फेडतात. कोंबड्या-बकऱ्याचा नैवेद्य दावतात. त्यांच्या नावाने शेरणी वाटतात. तसेच ठराविक तिथीला, वाराला हे लोक देवदैवतांची, ग्रामदैवतांची, कुलदैवतांची, पांढरीतील देवदैवतांची विधीवत पूजा करतात. त्यांच्या नावाने त्यादिवशी उपवास धरतात. गावशिवारातील भूताखेतांची पूजा केल्याशिवाय व त्यांना ओला सुका नैवेद्य दिल्याशिवाय कार्यसिध्दी पूर्ण होत नाही अशी त्यांची लोकश्रध्दा आहे. शेतीच्या हंगामाच्या सुरूवातीला निरनिराळ्या ग्रामदैवतांची व पांढरीतील देवदैवतांची विधीवत पूजा केल्याशिवाय, कौल घेतल्याशिवाय शेतीच्या कामाला हात लावत नाही. शेतातील राबणी, पेरणी, आवणी (लावणी), याटाळणी (कापणी), मळणी करण्यापूर्वी सर्व देवदैवतांची, भूताखेतांची पूजा आणि नैवेद्य पाणी करणे जरूरीचे असते. त्यामुळे गावाला, कुळाला, गुराढोरांना, शेती-भातीला काही अडचण येत नाही. या दैवतांची पूजा केल्याशिवाय सुखाचे दिवस येणार नाहीत यावर त्यांचा ठाम विशास आहे. इतकेच नव्हे, तर गावपांढीतील दैवतांना कौल लावून गावागावांची 'साथ' होते. साथ केल्याशिवाय कोणीही शेतीच्या कामाला सुरूवात करत नाही. हंगामानुसार एक किंवा दोन विशिष्ट वारांना

गावपांढरीतील दैवतांच्या नावानं 'मोडा' धरण्याचा पिढ्यांपिढ्या प्रघात आहे. या अनुषंगाने संजय लोहकरे यांच्या 'राब' कथासंग्रहातील कथांमध्ये देवदैवतविषयक मिथके आपल्याला दिसून येतात.

संजय लोहकरे यांच्या 'राब' कथासंग्रहातील 'राब' या पहिल्याच कथेमध्ये हारण्याआयचा नवरा, हानम्या लहान असतानाच ममयला रेतीबंदरावर कामाला जातो. त्याची हरण्याआयना अनेक वर्षे वाट पाहून तो परत घरी येत नाही. तेव्हा हानम्याचा बा परत यावा म्हणून हारण्याआय आपल्या गावपांढरीतील मुक्ताआय आणि सटवायला नवस कबूल करते. ही आदिवासी समाजातील मिथक परंपरा सर्वत्र दिसून येते. हे परंपरेने रूजलेले मिथक आहे. ही आदिवासी समाजाची श्रध्दा आहे, लोकमानस आहे.

अशा परस्थितीत हारण्याआय, आपला मुलगा हानम्या वयात आल्यानंतर त्याचं लग्न नववी शिकलेल्या चंदीबरोबर करून देते. हानम्याच्या सुखी संसाराला एक वर्ष पूर्ण होते. मग हारण्याआयला आपल्या मुलाचा वंश वाढावा म्हणून ती मुक्ताआयला तलग 'जानी' सोडायची कबूल करते. तसेच एक वटीभराण वाहण्याचं कबूल करते. नातवंडाचे तोंडमुख पाहाण्यासाठी खेड्या-पाड्यातील माणसांचे हे प्रातिनिधिक चित्र लेखकाने या मिथकाद्वारे अचूक उभे केले आहे.

याच कथेमध्ये पूसाचा मयना सुरू झाला तेव्हा हारण्याआय आपल्या लेकाला आन् सूनंला राबणीची आठवण करून देते. मग दुसऱ्या दिसापसून हानम्या व चंदी उंबाऱ्याच्या आडवत राबणी करण्याचं इसून झोपी जातात. सकाळी चंदी लवकर उठून आनसूट पाण्याचा निवद शिजवून घेते आन् सोबत गूळ घेते. सकाळी राबाया सुरूवात करण्यापूर्वी हानम्या राबणीची विधीपूर्वक पूजा करतो ते असा-''हानम्याना ऐलापैलाच्या झाडाली गूळ भाताचा निवद ठिवला. तेंच्या पाया पडला. आभाळाकं पहून त्वांडातल्या त्वांडात पुटपुटला. याकदा कॉयता कपाळाला लावला.''[४](पृष्ठ २१) ही आदिवासी माणसाची निसर्गाप्रती असणारी खरी श्रध्दा आहे. निसर्ग हाच आपले पालन पोषण करणारा असल्याने आदिवासी निसर्गाशी लीन होतो. निसर्गाला आपण ओरबडला तर त्याचा अतिरेक होईल. सृष्टीची ऋतुचक्रे बिघडतील. त्यामुळे अनेक संकटे निर्माण होतील. पर्यावरणाचे संतुलन बिघडेल याची निरक्षर आदिवासींना पूर्ण जाणीव आहे. निसर्गाचे संरक्षण, जतन आणि संवर्धन करणे ही आपली नैतिक जबाबदारी असल्याचे ते मानतात. आदिवासी हे आपले आद्य कर्तव्य असल्याचे मानतात. त्यामुळेच हानम्या राबणीला सुरूवात करण्यापूर्वी निसर्गदिवतेचे विधिवत पूजन करूनच राबायला सुरूवात करतो. हे पिढ्यानूपिढ्या आदिवासी संस्कृतीमध्ये घडत आले आहे. हानम्याच्या या कृतीतून आदिवासी समाज वनश्रींना, वृक्षवेलींना पुनर्जन्म देण्याचे महत कर्तव्य करत आला आहे. राबणी करताना कोणताही आदिवासी झाडाच्या शेंड्याला आणि बुंध्याला कोयता, कुऱ्हाड कधीच लावत नाही. ही आदिवासींची उन्नत संस्कृती आहे. येथे निसर्ग देवतेचे मिथक लेखकाने अतिशय समर्पकपणे वापरल्याचे दिसून येते.

आदिवासी हा देवभोळा आहे. आदिवासी समाजातील लोक देवदैवतांवर, ग्रामदैवतांवर, कुलदैवतांवर, पांढरीतील देवदैवतांवर श्रध्दा ठेवून आपले दैनंदिन जीवन जगत असतात. या निमित्ताने अनेक विधीविधाने केली जातात. 'बोहाडा' हा आदिवासी समाजामध्ये असाच लोकप्रिय उत्सव आहे. आदिवासी भागात बोहडे सामान्यपणे चैत्र पौर्णिमेपासून सुरू होतात. आदिवासी भागातील काही गावांमध्ये गावपांढरीतील ग्रामदैवतांच्या नावाने बोहडे साजरे केले जातात. तो

 ISSN- 2319-6033 फडकी

आदिवासींचा एक सांस्कृतिक उत्सव आहे. हा उत्सव म्हणजे त्या त्या गावांची जत्राच असते. या कार्यक्रमात निरनिराळ्या देवतांच्या प्रतिमा करून त्या नाचविल्या जातात. तेव्हा देवताना आवाहन केले जाते. या कार्यक्रमात मानाची सोंगे, नवसाची सोंगे ठरलेली असतात. बोहड्यात सोंगे नाचवताना तेथे जमलेल्या काही भक्तगणांच्या अंगात दैवीशक्ती संचारत असते. यावेळी ते डोक्यावर पेटती घागर घेऊन देवळाला प्रदक्षिणा घालतात. नवस फेडतात. या अनुषंगाने संजय लोहकरे यांच्या 'राब' कथासंग्रहातील 'आवणी' आणि 'फालिस्ट' या कथांमधून बोहड्याचा उल्लेख येतो. 'आवणी' या कथेत लेखक म्हणतो, ''वैशाख आमुश्याला बोहाडा नाचलान् येत्या मंगाळवारी आख्या गावाना कळमजाला कोंबडं बकरं कापून निवद ठिवला व्हता. दुसऱ्या दिसापसून आख्या गावाना धुळवफीत रॉपा टाकली व्हती. गंग्या भगताना मंगाळवारीच कळमजाला 'फुला लावून' कौल घ्यातला व्हता. मह्या आज्याना औंदा दोनेक मनाची रॉपा टाकली व्हती........''[५](पृष्ठ ३०) तर 'फालिस्ट' या कथेत लेखकाचे निवेदन येते की, ''घाटघरचा बोहाडा झालान् येत्या मंगाळवारी समद्या गावाना कोंबड्या-बकऱ्या कापून घाटनदेईची पुंजा केली व्हती. आख्या शिवारात धुळवफीतच रॉपा टाकली व्हती. मिरूग पडून हाम्रा झाला व्हता. मिरगाच्या पावसाना औंदा तापेल भुई आठ दिसात थंडावली व्हती. तिची लय हाऊस फिटली व्हती. मिरूग सरून आडदरा लागल्या व्हत्या. आवणीची पकी पल आली व्हती..........''[६](पृष्ठ ४४) या दोन्ही कथांच्या वरील निवेदनातून असे लक्षात येते की, आदिवासी समाज हा आपल्या परंपरागत देवदैवतांवर, ग्रामदैवतांवर, कुलदैवतांवर, पांढरीतील देवदैवतांवर श्रध्दा ठेवू आपले दैनदिन जीवन जगत असतात. त्यांची विधीवत पूजा केल्याशिवाय ते शेतीतील कामे करत नाहीत. ही मिथक परंपरा त्यांच्या मूळ स्वभावात रूतून बसली आहे.

**२. सण-उत्सवाची मिथके:-**

आदिवासी समाज हा सण-उत्सवप्रिय आणि निसर्गपूजक आहे. निसर्गाच्या सान्निध्यात आपले दैनंदिन जीवन जगत असताना तो विविध सण उत्सव साजरे करतो. परंपरेनुसार त्यांचे विधीविधाने करतो. हे सण उत्सव साजरे करताना तो आपले दु:ख, दारिद्र्य, गरीबी व संकटे विसरून जातात. हे आदिम समाजाचे अनोखे दर्शन आहे. हे सर्व संजय लोहकरे यांच्या 'ढोल' या कथेतून प्रतिबिंबित होते. त्यांच्या 'ढोल' या कथेतून सातपुडा पर्वतरांगांतील आदिवासींच्या होळी या सणाच्या निमित्ताने मिथक निर्मिती केली आहे.

होळी या सणाला आदिवासी समाजात अतिशय महत्त्व आहे. होळीचा सण जसजसा जवळ येईल तसतशी त्यांची महिनाभर आधीपासूनच तयारी सुरू होते. मजुरीसाठी गेलेले मजुरकरी होळीच्या सणानिमित्ताने गावी येतात. मग होळीच्या दिवशी ढोल काढून होळीच्या माळावर वाजवायला सुरूवात होते. तशी प्वारा-स्वारा, बाया-बापड्या, येडी, धडी माणसा वाजणाऱ्या ढोलाच्या दिशेने नाचत येतात. कमराला भोपळं, पायात घुंगरा, गळ्यात रानफुलांच्या माळा, डोक्यावं भला मोठा पाच फूट उंच मोरपिसाचा टोप, आंगावं ढवळं ढवळं पटटं घेऊन नाचे गडी ढोलाच्या पाया पडून नाचत होतं. प्वारा पोरी एकमेकांच्या गळ्यात, कमरात हात घालून पाय मातीवं थांबू देत नव्हती. लय बेधूंद हाऊन नाचत होती. रिंगान लय रंगात आला होता. तहान भूक विसरून, लहान मोठा विसरून सगळी गावातली बारीक सारीक होळी भोवती नाचत गात होती. नाच रंगात येता येता रात कधी सरली त्या समजलाच नही. पण रात्रीचा चांद जरा वेळ थांबला आसन, चांदण्या हसल्या खिदळल्या असतील. आन्

कोंबड्याना सुर्यदेवाला पहिली आरोळी ठोकली. तव्हा पाटलाना होळी पेटवून नारळ फोडला, कोंबडी कापून नैवेद्यपाणी केला. तोपर्यंत उजेड आला व्हता. सर्व लहान थोर नाचण्यात गुंग होते. पण अचानक ढोलाची थाप थांबली आन् कधीच न थांबणारी थाप का थांबली म्हणून नाचणारे पाहू लागले. तेव्हा आमश्या ढोल्या ढोलाच्या आधारानं स्वत:लाच सावारीत मातीवं पडला होता. ढोलाचा नाद यकदम बंद झाला, तसा आमश्याचा श्वास बंद झाला व्हता.

आमश्याची डोली रानावनातल्या पळसफुलांनी सजली. सर्वजण डोली भोवती बसले. तेव्हा जागल्या भगत या दु:खाला वाचा फोडतो. तो सबंध मानव विश्वाला आदर्श असा संदेश देतो की, 'या पृथ्वीतलावर ज्या जीवाने जन्म घेतला, त्याचा अंत एक दिवस निश्चित आहे. प्रत्येकाला जन्म आणि मरण निसर्गच देतो. म्हणून तर झाडे दु:ख करत बसत नाहीत. प्राणी पक्षांचेही तसेच आहे. माणूस निसर्गातील एक क्षुल्लक जीव आहे. त्याला उद्या ज्या सागाच्या झाडाखाली खडडा करून गाडाल, तिथं एक सागाची बी लावा. ती रूजेल. त्याचा मोठा झाड होईल. त्याचा कोणी तरी ढोल बनविल. तो ढोल आमश्याच्या रूपाने वाजू लागेल. पाखरा, भेकराली, रानावनाली त्या ढोलाचा आवाज जाईल. आमश्या जिवंत झाल्याची खात्री होईल'[७]. हे लेखकाने प्रतिकात्मक मिथक योजले आहे. मानव आणि निसर्ग यांचे नाते अतूट आहे. हा संदेश लेखकाने या मिथकातून दिला आहे.

**३. कणसरी मातेचे मिथक:-**

'कणसरी माता' ही आदिवासींची स्त्री देवता, मातृदेवता आहे. आदिवासी समाजातील शेतकरी शेतामध्ये चांगले पीक यावे म्हणून तिची आराधना करतात. कणसरी देवीची कथा विविध लोकगीतांतून, लोककथांतून आलेली पाहावयास मिळते. संजय लोहकरे यांनी 'राब' या कथासंग्रहातून 'कणसरी' नावाची कथा ढवळ्या आबाच्या निवेदनातून कथन केली आहे. माणसाला पृथ्वीवर सापडलेले हे पहिले धान्य आहे. प्राचीन काळी माणसे कंदमुळे, फळं आणि शिकार करून जगत होते. पण त्याला नागली हे पहिले धान्य सापडले. नागली अतिशय जिव्हाट आहे. कुठेही लावली तरी भरभरून पीक घेऊन येते. हे अतिशय कसदार धान्य आहे. जुन्या काळी रोगराई आल्यावं माणसे पटापट मरत असत. त्यातच एखाद्या बारीक मुलाची आई मेली तर नागलीच्या पिठात पाणी कालवून दूध म्हणून पाजायचे. ते पिऊन मुलं जगायची. अशा लय पिढ्या जगल्या. नागलीला लोक आई म्हणून तिची पूजा करायला लागले. तिला देवी मानायला लागले. तिलाच मग कणसरी माता म्हणू लागले. तिला कोणीच कधी विकायला घराच्या बाहेर काढत नाही. ती कितीही दिवस जशीच्या तशी राहाते. तिला कीड लागत नाही की खराब होत नाही. लय पौष्टिक धान्य. तिचा बी कोणीही मोडत नाही. प्रत्येक आदिवासींच्या शेतामध्ये ती थोडी का होईना असतेच. नागलीच्या धान्याचं बी म्हणून जतन झालं पाहिजे.

कणसरी मातेचं मिथक योजून संजय लोहकरे यांनी या कथेची निर्मिती केली आहे. ढवळ्या आबा आन् रंग्याआयना आख्या हारणमाळावं नागली लावली होती. ती याटाळायला रंग्याआयना मोलकरी घेतले होते. सगळी नागली याटाळून झाल्यावं खळ्यावर वाहून आणली. मग संध्याकाळ झाल्यावर सर्वजण घरी गेले. तेव्हा नागली राखायला खळ्यावरच्या कोपीत ढवळ्या आबा आन् त्याला जोडी किसन्या हेंगाडा थांबले होते. मग जेवणाकरून तेंच्या जोडीला कळमजाआयच्या वाडीतील आणखी चार पाच मुलं आली. त्यांनी खळ्यातील नागली पाहिल्यावर आश्चर्य चकित झाले. येवढे नागलीचे जोरात

ISSN- 2319-6033 फडकी

पीक आले होते. तेव्हा येसू आंधळा ढवळ्या आबाला म्हणाला, "का रं धवळ्या आबा, दोन च्यार पोती नागली इकून औंदा सीतीचा लगीन करून टाक."[८](पृष्ठ ४१) तेवढ्यात ढवळ्या आबा यकदम गपगार झाला. या नईन प्वाराली उमज नही. आसा मनात म्हणाया लागला. मंग त्याने कणसरी मातेची गोठ सांगायला सुरूवात केली. अशा प्रकारे या पृथ्वीवरील नागलीचं महत्त्व, तिला देवांच्या दरबारी असलेलं स्थान, ती आदिवासी शेतकऱ्याकडे कशी आली अशी संपूर्ण कहाणी ढवळ्या आबाना प्वारांना सांगितल्यावर ती नतमस्तक होतात. खळ्यातील नागलीला हात जोडतात. तिला माता म्हणतात. असे इथे लेखकाने कणसरी मातेचे मिथक योजून उगवत्या पिढीच्या मनावर परंपरागत पिढीचे संस्कार संक्रमित होतात.

**४. वीर पुरूषांची मिथके:-**

आदिवासी ही लढवय्या जमात आहे. ही अतिशय शूरवीर आणि काटक जमात आहे. इंग्रजांनी भारतात इस्ट इंडिया कंपनीची स्थापना केल्यानंतर आदिवासींच्या समाजजीवनात ढवळा ढवळ करावयास सुरूवात केली. त्यांचे हक्क काढून घेण्यास सुरूवात केली. तेव्हा आदिवासींनी वेगवेगळ्या प्रांतातून इंग्रजांविरूध चळवळी उभ्या केल्या. लढे उभारले जाऊ लागले. जमीनदार आणि धनिकांनी इंग्रजांशी मिळते जुळते घेऊन आदिवासींच्या जमिनी ताब्यात घेतल्या. त्यामुळे दिवसेंदिवस संघर्ष आणि लढे वाढत गेले. त्यामुळे हळूहळू आदिवासी भागात सावकारी वाढत गेली. आदिवासींच्या जमिनी सावकारांनी आणि जमीनमालकांनी मामुली रक्कमेपोटी ताब्यात घेतल्या. गोरगरीबांची उपासमार होऊ लागली. त्यांची लुटमार, उपासमार उघड्या डोळ्यांनी दिसत होती. ही कोंडी फोडली पाहिजे असा निर्धार करून काही आदिवासी तरूण एकत्र आले. त्यांनी इंग्रज, सावकार, आणि जमीनदार यांच्या विरोधात वेगवेगळ्या प्रांतातून लढे आणि चळवळी उभ्या केल्या. हा आदिवासींच्या शोषणमुक्तीचा लढा होता. या लढ्याला आदिवासी जनसामान्यांचा पाठिंबा होता. ते खरे आदिवासींचे कैवारी होते. त्यांनी गरीब आणि दिनदुबळ्या आदिवासींना आधार दिला, मदत केली. ही आदिवासींची खरी दैवते होती.

या अनुषंगाने संजय लोहकरे यांच्या 'राब' कथासंग्रहातील 'राब' आणि 'कणसरी' या कथांमधून आदिवासी क्रातिकारकांची मिथके योजली आहेत. 'राब' या कथेमधून गावाच्या खाली धरण होणार आहे. त्या ठिकाणी गावातील सवर्णांच्या थोड्थोड्या जमिनी धरणात जाणार म्हणून ते आदिवासींच्या बारा वाड्यांना गावात सभेसाठी बोलवतात. या सभेत पाटलाचा पोऱ्या आदिवासी क्रांतिकारकांचा पराक्रम सांगतो व सरकारविरूध जनमत जागृत करतो. तो म्हणतो, "गाववालेहो, माझ्या बंधू आन् भगिनींनो, हे सरकार आपल्या जिवावं उठलंय. त्याला डोंगरदऱ्यातल्या माणसांची किंमत नही. तेंच्या जगण्या-मरण्याशी घ्याना देना नही. सरकारला आमची काळजी नही. आमच्या श्याताची फिकीर नही. आपला गाव स्वातंत्र्यासाठी लढला. मारत्या आढळ, होन्या केंगले, राघू भांगरा, कोंड्या नवला इंग्रजांच्या विरूध लढला. आपू त्यांचं वारसदार. या मातीचं राखणदार. आपण तेंच्यासारखा लढू. आपली सोन्यासारखी जमीन पाण्यात बुडू दे ची नही. आपण स्वातंत्र्यात जगतोय."[९] (पृष्ठ २२-२३) तर 'कणसरी' कथेत हारण्याआयना हारणमाळावं नागली याटाळायला माणसा घेतली असत. नागली याटाळता याटाळता बाळ्या जळंद्याना कोंड्या नवलेंची गोठ लावली आसं. यामधून आदिवासी क्रातिकारकांचा पराक्रम, आदिवासींसाठी त्यांचे योगदान, सावकार, जमीनदार, यांच्या कर्जातून केलेली मुक्तता, इंग्रजी

अत्याचाराविरूध घेतलेली भूमिका या वर्णनातून ते क्रांतिकारकांचे गुणगौरवांचे कथन करतात. ही जनमाणसात रूजलेल्या ऐतिहासिक वीरपुरूषांच्या मिथकांचा लेखकाने अचूक वेध घेतला आहे.

**५. प्राणी, पशु-पक्षीविषयक मिथके:-**

आदिवासी समाज हा पिढ्यान्पिढ्या निसर्गाच्या सान्निध्यात राहात आहे. जंगलातील पशु-पक्षी, प्राणी यांच्याशी त्याचा नित्य संबंध येत असतो. प्राचीन काळातील आदिवासींच्या पिढ्या या जंगलातील कंदमुळे, फळे, रानभाज्या आणि शिकार यांवरच जगल्या आहेत. त्यामुळे आदिवासी आणि जंगलातील पशु-पक्षी, प्राणी हे एकमेकांवर अवलंबून असतात. त्यांचा वंश वाढावा, त्यांचे संरक्षण आणि संवर्धन केले पाहिजे ते आपली नैतिक जबाबदारी मानतात. त्यामुळे पर्यावरण संतुलन राखले जाईल याची त्यांना जाणीव आहे. हा भूतदयावादी दृष्टिकोन त्यांना आपल्या पूर्वजांकडून वंश परंपरागत मिळालेला आहे. काही आदिवासी जमातीतील आडनावे पाहिली तरी असे लक्षात येते की, या पशु-पक्षी, वृक्ष-वेली आणि प्राण्यांच्या नावांवरून त्यांची आडनावे ठेवल्याचे लक्षात येते, इतके अतुट नाते आदिवासी आणि जंगलातील पशु-पक्षी, वृक्ष-वेली आणि प्राण्यांशी त्यांचे आहे. याचा प्रत्यय संजय लोहकरे यांच्या 'राब' कथासंग्रहातील 'आवणी' आणि 'जीतराब' या कथांमधून येतो. त्यांच्या काही कथांमधून आजा येतो. हा आजा निसर्ग सृष्टीतील पशु-पक्षी, जलचर, किटक, भवरे, नाकतोडे, खेकडी, मासे, बेडूक वृक्ष-वेली आणि प्राण्यांवर निस्सिम प्रेम करणारा आहे. हा आजा म्हणजे निसर्गाचा एक अविभाज्य भाग आहे. तो पृथ्वीतत्व जाणणारा आहे. निसर्गातील या सजीव सृष्टीचे त्याला ज्ञान आहे. म्हणून तो समस्त आदिवासी समाजाचा मार्गदर्शक आहे. काय चांगले, काय वाईट याची त्याला जाणीव आहे. म्हणून संजय लोहकरे यांच्या 'आवणी' कथेतील आजा शेतातील पिकांना रासायनिक खत मारायला विरोध करतो. कारण शेतातील पिके आणि सजीवसृष्टीवर त्याचा विघातक परीणाम होईल याविषयीचा दूरदृष्टिकोन आज्याजवळ आहे. म्हणून तो आपल्या मुलाला म्हणजे तुक्याला आपल्या शेतातील पिकांना युरिया खत मारला म्हणून रागवतो आणि याचे दुष्परीणाम काय होतील ते तो समजावून सांगतो की, ''.......आरं श्यातात घाम गाळून, मेहनत करून, गुरा वासरा पहून भात पिकवायचा, म्हंजी त्या कष्टाचा लय दिवस पुराताय आन् फुकाटचा भुस्काटासारखा उडून जाताय.''[१०] (पृष्ठ ३१) कारण रासायनिक खताचा वापर केल्यामुळे शेतीतील पिके कसदार न येता कुपोषित येतील. त्याचा मानवी आरोग्यावर विपरीत परीणाम होईल. म्हणून शेतामध्ये घाम गाळून, कष्ट करून शेती पिकवली पाहिजे. प्रामुख्याने शेतीमध्ये सेंद्रीय खताचा वापर केला पाहिजे. त्यामुळे शेतीतील पिके कसदार येतील. मानवाला आरोग्याच्या समस्या येणार नाहीत. अर्थात, माणूस निरोगी आयुष्य जगेल. निसर्गातील सुक्ष्म जीवसृष्टी वाचेल आणि पर्यावरणाचे संतुलन राखले जाईल. आखिल मानवजात सुखी होईल, असा लाख मोलाचा सल्ला येणाऱ्या उगवत्या पिढीला तो देतो आहे.

या 'आवणी' कथेतून येणारा आजा हा निसर्गातील पशुपक्षी, किटक, खेकडी, मासं, भवरं, बेडूक यांवर आपल्या पोटच्या मुलांप्रमाणे प्रेम करणारा आहे. या जीवसृष्टीचा वंश वाढावा, त्यांचे संरक्षण आणि संवर्धन केले जावे. आपलेली जीवय तसा त्यांनाही जीवय. म्हणून आपणच त्यांची काळजी घेतली पाहिजे. तेव्हाच निसर्गचक्र व्यवस्थित चालेल. पाऊस पाणी वेळेवर पडेल. सर्व मानवजीव सुखी होईल, असा भविष्याचा वेध घेण्याची क्षमता आजाजवळ आहे. म्हणून तो तुक्याला

त्याच्या आजाचा निसर्ग जीवसृष्टिविषयीचा भूतदयावादी दृष्टिकोन सांगतो. तो म्हणतो की, ''आरं, भात काय फक्त आपलेलीच खाया लागाताय? तेचेवं आखी ख्याकडा, बेडका, नाकतोडं, भुंगं जगंतंत. ते हायेत म्हणून त श्यात कसा गावासारखा खेळत रहेताय. आन् लय पिढ्यांपसून ही ख्याकडा, बेडका, पाखरा, भेकरा, मासं बिसं आपल्यासंगं जगंत्यात. आपलेली जीवंय तसा तेन्लीय जीवंय. त्या रानच्या पाखराली, ख्याकडा बेडकाली आपून जगावला त आपलाय जीवन चांगला जाताय. सुखाना मरान याताय. यक दोन काड्या खेकडीना खाल्या तरी आपलेलीय रयला पयजे म्हणून त्या चुडात काड्या जास्तीच्या लावायच्या. ह्या कीड्या मुंग्यांचा इच्यार आपुनच क्याला पयजे. निस्ता आपूनच जगून कसा चालंल बरं? तेंच्याशिवाय माणसाली शोभाच नय.''[११] (पृष्ठ ३३) अशा ही आदिवासी संस्कृती मुक्या जीवसृष्टीवर माया करणारी आहे. आपल्या जीवासारखाच त्यांच्या जीवाचा विचार करणारी आदिवासी संस्कृती आहे. म्हणून ती इतर संस्कृतीपेक्षा आपले वेगळेपण आजही टिकवून आहे. हे संस्कार एका पिढीकडून दुसऱ्या पिढीकडे नकळतपणे संक्रमित होत असतात. या कथेतील आजा आपल्या नातूला रासायनिक खतांच्या दुष्परीणामांची जाणीव करून देताना म्हणतो, ''........आरं, तुझ्यावं जेवढा ना जीव मव्हा, त्यावढाच त्या खाचरातल्या ख्याकडा बॅडकावं रह्याचा. पण ह्या इरया खताना तेंच्या वंशाचाच वजबूड झाला. तुह्या बा ना लय वाईट क्याला. आरं, असा करता करता यक दिवस माणसाचाय वजबूड व्हईल र बा.......''[१२] (पृष्ठ ३४) असा हा जुन्या पिढीचा आजा रासायनिक खताच्या दुष्परीणामापासून सर्व जीवसृष्टीला वाचवण्याची धडपड करणारा आहे. प्रसंगी आपल्या जवळच्यांनाही खडे बोल सुणवणारा आहे. पण आजची तरूण पिढी स्वार्थी हव्यासापोटी कसलाही विचार न करता सर्रास रासायनिक खतांचा वापर करून शेतीतील पिके घेऊ लागली आहे. हे सर्व पाहून आजा अस्वस्थ होतो. त्याचे परिणाम आज दिसायला लागले आहेत. आज आपण सेंद्रीय खतांचा वापर बंद केला नाही तर एक दिवस माणसाचाय वंशबूड होईल. हे आजाचे विचार आजच्या पिढीने लक्षात घेतले पाहिजेत.

याच आशयाची दुसरी कथा संजय लोहकरे यांच्या 'राब' कथासंग्रहातील 'जीतराब' ही होय. या कथेतील आजा लहान मुलांना आखटीवं बसून मुक्या जीतराबांविषयीचं तत्वज्ञान त्यांच्या बालविश्वात जाऊन त्यांना समजावून सांगतो. कारण आज्याला आख्या रानाचा पंचांग माहीत आहे. तो लय ज्ञानी आहे. त्याला मुक्या जीतराबांविषयी लय माया आहे. म्हणून तो सरवानात गावात रगात सांडू देत नाही. तसेच गावातील मुला-माणसांना हा आजा सरवानात खेकडी मासं खाऊ देत नाही. कारण तेंच्यावच आपल्या कैक पिढ्या जगल्या आहेत. सरवानात खेकडी, मासं पिल्ला सोडतात. म्हणून सरवानात आपण खेकडी, मासं खाल्लं तर त्यांच्या पोटातील पिल्ले मरून जातील. त्यांचा वंश बुडेल. म्हणून आजा सांगायचा की, भाद्यापसून पुढं खुशाल खेकडी, मासं खा. कारण त्यानंतर खेकडी, मासं आपल्या पोटातील पिल्ले ओढ्यातील पाण्यात सोडून मोकळ्या होतात. मग पिल्ले ओढ्यातील पाण्यात मज्यात खेळू लागताता, वाढू लागतात. त्यांचा वंशबुड होत नाही. अशा मुक्या प्राण्यांचे जगवण्याचे तंत्र या उगवत्या पिढीच्या मनात बिंबवण्याचं काम हा आजा करतो आहे. हे संक्रमण या मिथकातून लेखकाने मांडले आहे.

संजय लोहकरे यांच्या 'राब' कथासंग्रहातील 'शिणगाराची पटी' या कथेमधून असाच मुक्या प्राण्यांवरील मायेचा जिव्हाळा आला आहे. आपण जरी त्यांची शिकार केली तरी त्यांचा वंश वाढला पाहिजे.

त्यांचे संरक्षण हे आपले परम कर्तव्य ते समजतात. आपलेली जसा जीव आहे तसा त्यांनाही जीवय म्हणून या मुक्या जिवांची काळजी आपणच घेतली पाहिजे. या भावनेतून ते या निसर्ग जीवसृष्टीकडे बघतात. भादयाच्या महिन्यापासून ते खेकडी मासे खायाला सुरूवात करतात.

''भाता पोट्यात आली का ठक्या आबा, लाल्या आबा, चिंध्या आबा रोज शिणगाराच्या पटीच्या सांडीवं भॉतडा मांडीत आसं. भाता निसवाया लागली का भॉतडात पकं मळ्हे पडत आसं. भातात पकी बॅडका, बेरकड्या, भवरं, नाकतोडं खेळत आसं. राती तीन-चार भॉतडा सांडीवं रहेत आसं. पहाटी-पहाटी भॉतडावालं मासं झटकून आनीत आसं. ठक्या आबाना भॉताड झटाकला का तेतलं दोन-तीन मळ्हे उजूक शिणगाराच्या पटीत फेकीत आसं.......''[१३](पृष्ठ ८६) असा निसर्गसृष्टीतील पशु-पक्षी, जलचर, किटक, भवरे, नाकतोडे, खेकडी, मासे, बेडूक, वृक्ष-वेली आणि प्राण्यांच्या वंश वृध्दीचा विचार आदिवासी संस्कृती करते. हे लेखकाने या मिथकांमधून प्रतिबिंबित केले आहे.

**६. कलाविषयक मिथके:-**

आदिवासी समाजात कलेला अतिशय महत्त्व आहे. तो विविध कलांमध्ये निपून आहे. या कला आदिवासी समाज जीवनाचा अविभाज्य भाग आहेत. त्यांच्या जीवन जगण्याची ती एक प्रचिती आहे. आदिवासी समाज हा विविध सण उत्सवांमध्ये प्रसंगानुरूप लोकगीते, नृत्यकला, वाद्यकला, संगीतकला, चित्रकला त्यांच्या जीवन जगण्याचा भाग बनून येतात. प्रामुख्याने या कला ते कोणाकडेही शिकायला जात नाहीत. त्या त्यांना वंशपरंपरेने अवगत होत असतात. ती एक सांस्कृतिक संक्रमणाची प्रक्रिया आहे.

आदिवासी समाज हा समूहाने जगतो. कोणत्याही सण उत्सवामध्ये सहभागी होताना त्यांच्या कलेचे प्रभाविपणे दर्शन होते. नाचताना, गाताना त्यांची चाल, लय, ठेका डोळ्यांची पारणे फेडतात. नाचतानाची त्यांची तल्लीनता, सामूहिक भावना, नाचण्यावर मनापासून केलेले प्रेम, नृत्यातील पावित्र्य पाहाता हे सर्व एकाग्रतेशिवाय शक्य नाही. जीवनावर आणि जगण्यावर मनापासून प्रेम करणारी ही माणसे आपल्या कामावर, नृत्यावर आणि संगीतावर एकाग्र होतात. दु:ख, दारिद्र्य, संकटे, गरिबी हे सर्व विसरून सहभागी होतात.

आजच्या जागतिकीकरणाने मानवी जीवन निराशेच्या एका टोकावर पोहोचले आहे. थोड्याशा निराशेने अनेकांनी आपले आयुष्य संपवलेले आपण बघतो. पण आदिवासी माणसे मात्र स्वच्छंदी, आनंदी जीवन जगताना दिसतात. हा आनंद, हा स्वच्छंदीपणा, ही जीवनावर, जगण्यावर मनापासून प्रेम करण्याची कला त्यांना निसर्गाने बहाल केलेली आहे.

आदिवासी समाजात 'धांगडी तमाशा' ही कला गावोगावी पहायला मिळते. शिमगा आला, लग्नसराई आली, जत्रा आल्या की गावागावातील तरूण मंडळी एकत्र येऊन तमाशाचा फड उभा करतात. या धांगडी तमाशात लोकजीवनाचे प्रतिबिंब उमटलेले असते. थकल्या भागल्या जीवाला या धांगडी तमाशामुळे विरंगुळा मिळतो, त्यांचे मनोरंजन होते. त्याचबरोबर समाजस्थितीचे दर्शनही होते.

प्राचीन काळातील आदिवासींची चित्रकला आज विविध दृष्टिकोन आणि संदर्भासह प्रकाशझोतात येत आहे. बिहार, ओरिसा, मध्यप्रदेश, महाराष्ट्र, गुजरात या सर्वांमधून एक सांकेतिकता आधोरेखित होते. गेल्या तीन-चार दशकांपासून वारली चित्रकलेचे जनक पद्मश्री जिव्या सोमा म्हशे यांनी वारली चित्रकलेचा जगभर प्रचार आणि प्रसार केलाआहे. निसर्ग, माणूस, पशु-पक्षी, तारे, नक्षत्र, नद्या, पर्वत या सर्वांसह मानवी जीवन चितारणारे जिव्या

ISSN- 2319-6033 फडकी

सोमा म्हशे यांनी वारली संस्कृतीतील आणि निसर्गदृष्यातील, वारली समाजजीवनातील विशिष्ट मूळ संकल्पना घेऊन चित्र रेखाटतात. मानवाच्या वैश्विक भावना, उत्पत्तीमागील प्रेरणा, निसर्ग जाणिवा, प्राकृतिक नियम या सर्वांसह त्यांची वारली संस्कृती जगासमोर अभिव्यक्त झाली आहे. ज्या चित्राने त्यांना जगभर प्रसिध्दी मिळाली त्या चित्रात त्यांनी निसर्गातील आणि वारली कृषिसंस्कृतीतील सहजीवनाचा देखावा संजय लोहकरे यांच्या 'राब' कथासंग्रहातील 'जिवाबा' या कथेमधून मिथकाच्या अंगाने चित्रित केला आहे.

जिवाबा हे चित्र काढतानाचे वर्णन लेखक असे करतो की, ''मंग जिवाबाना घरात येऊन येळूच्या काडीना बाडगीतला पीठ हालवून पयला आसं. आता पिठाला तार आली आसं. लय रंग आला आसं. मंग ती बाडगी घेऊन वजंवजं ओवऱ्यात आला आसं. मांगचा पुढचा दार उघडून दिला आसं. तेंच्यानाओवरीच्या भीतीवं उजेड पडला आसं. त्याना लगेच भीतीवं चितार काढाया घ्यातला आसं. भरा भरा आड्या-तिड्या रेघा त कंधी गोल गटुळं काढून आंधी यक चौरास आखूण घेतली आसं. मंग त्या चौराशीच्या मंदी त्याना मोठा भाताचा खाचार काहाडला आसं. तेच्यात औता, रॉप खणणाऱ्या बाया, मूठ बांधणारी माणसा, मूठ वहून न्याणारी प्वारा, डोकेवं इरला घेऊन भात लाईत-लाईत मांगं पुढं चालेली माणसा, गुडघाभर चिखलात भाताची आवणी कशी मज्यात चालेय, आसा समदा सायसंगीत चितार काहाडला आसं. भाताच्या खाचरात बॅंडका, खेकडी, इरूळं, भवरं, नाकतोडं, मळ्हे काहाडलं आसं. मंग याका बाजूला खाचराच्या बहेर खळा काढून तेच्यात माणसा भात झोडीत्यात आसा दावला आसं. तिढंच कोंबड्या दाणं खात्यात, पाखरा भुर्रऽऽऽकान उडून जात्यात.......

भाताचा खाचार, आवणी, ब्रॅंडका, ख्याकडा, साप, मळ्हे, चिखलात औता, सांडीवं भॉतडा, रॉपांचं मूठ, इरला डोकेवं घेऊन आर्धी कमरात वाकेल माणसा, खाचराच्या बाजूला खळा आन् खळ्यात भात बडावणारी माणसा, जिवाबाना खाचराच्या बाजूलाच वढा वहेताना दावला आसं. त्या वढेच्या कडाला, दुपारच्या टायमाला यक पाय पाण्यातन् यक पाय प्वाटात घेऊन उभा रहेल बगळा काहाडला आसं. तेच्या पायेच्या भोती मासं खेळत आसं. तेच्यापसून जरा लांब यक बेडूक पाण्याबहेर वटवट करीतोय आन् म्हणून पाणेचं बुडबुडं निंगंतंत असा दावला आसं. आन् तिढंच बाजूला यक खेकड बटबट करीतेय, तिच्या डोळ्यातून उलीउली बुडबुडं निंगंतंत आसा दावला आसं आन् चितार सायसंगीत आला आसं.''[१४] (पृष्ठ १०६-१०७) जिवाबाच्या वरील चित्राचे निरीक्षण केले तर सर्वसामान्य माणसाला ते एक निसर्ग चित्र वाटेल. पण या चित्राचा शोध घेऊन सुक्ष्मपणे निरीक्षण केल्यास त्याचे वेगवेगळे अन्वयार्थ लक्षात येऊ लागतात. दुपारी ऊन पडला का बगळा ओढ्यांच्या काठी उथळ पाण्यात येऊन उभा राहातोय. त्यावेळी ओढ्याच्या कडेला माणसांची, जनवारांची निरवानिरव झालेली असते. अशा शांततेच्या वेळेला उन्हाच्या तापीत त्यावेळी तिथे चिखलात बसलेला एखादा बेडूक वटवट वटवट करीतोय. त्यावेळी तिथे खेकड बिळाच्या तोंडावर येऊन डोळ्यांची उघडझाप करून बटबट आवाज करताना पाण्यातून बाहेर बुडबुडे काढत असते. या दोघांच्या आवाजातील संकेत पाण्यातील माशांना सहज कळतो व आता ओढ्याच्या काठाला उथळ पाण्यात काहीच धोका नाही आसं समजून आणि त्या दोघांवर विश्वास ठेवून खोल पाण्यातील मासे अशा निरव शांततेच्या वेळी खेळत खेळत ऊन खायाला उथळ पाण्यात येतात. तर त्यांना उथळ पाण्यात स्थितप्रज्ञ उभा असलेला बगळ्याचा पाय दिसतो. पण ती एक स्थिर अशी उभी काडी पाण्यात असल्याचे समजून तिच्याभोवती

खेळतात. याचाच फायदा घेऊन बगळा माशांना आपले भक्ष्य करतो. वास्तविक हे मासे बेडूक खेकड्यांमुळे उथळ पाण्यात येतात आणि बगळ्याच्या तावडीत सापडतात. नाहीतर बगळ्यावर कोण विश्वास ठेवतो? आपण विनाकारण बगळ्याला ढोंगी बगळा म्हणून नाव ठेवतो. अशी या कथेतून संजय लोहकरे यांनी अप्रतिम मिथक निर्मिती केली आहे.

संजय लोहकरे यांच्या 'राब' कथासंग्रहातील 'तमाशा' या कथेमधून मिथकाच्या अंगाने धांगडी तमाशातील नृत्यकला चित्रित केली आहे. पूर्वी प्रत्येक गावात धांगडी तमाशाचा छोटा मोठा फड असायचा. या कलेतील कलावंत स्वत:ला किती वाहून घेतात याचे मूर्तिमंत उदाहरण लेखकाने 'शिंग्या नाच्या' या पात्राच्या मिथकातून मांडले आहे.

धांगडी तमाशात शिंग्या नाच्या नव-दहा वर्षाचा असतानाच जागल्याच्या हिरडीखाली नाचायला शिकला. हा गोरापान गडी, मध्यम उंचीचा, काटकुळ्या शरीरयष्टीचा नाकी डोळी देखणा होता. शिणगार केला की एखाद्या गोऱ्या गोमट्या पोरीवाणी दिसायचा. तो नाचायला लागला की एखाद्या नाचणाऱ्या बाईला लाजवेल इतका आफाट नाचायचा. शिंग्या नाच्या जणू काय नाचायलाच देवाना जन्माला घातलाय आसं पाहणाऱ्याला वाटायचे. काय ती कमराची लचक, डोळेची उघडझाप, छातीचा उसासा, काय ती नजरेची आदा, हातवारे, चौड्यावरील गिरकी, मानेचा झटका, आल्हाद उडी असा समदा बायमाणसासारखा सायसंगीत त्याचे नृत्य असायचे.

खऱ्या अर्थाने शिंग्या नाच्या कला म्हणून जगला. हा हाडाचा कलावंत होता. म्हणून या कलेला इतकं वाहून घेतले की आपला घर संसार, आई-वडील, नाती-गोती, शेतीवाडी, गुरेवासरे या सगळ्यांवर तुळशीपत्र ठेवून ही कला जगला. उतार वयात शेवटी या कलेतून निवृत्ती घेऊनही त्याला स्वस्थ बसता येईना. त्याने पुन्हा अशा उतार वयातही आपल्या कुलदैवताजवळ जाऊन कौल लावला व धांगडी तमाशात नाचण्याची अनुमती घेतली. त्याने शेवटपर्यत या कलेला वाहून घेतले, या कलेसाठी जगला. सर्वच आप्तस्वकीय, घरदार, शेतीवाडी, गुरेवासरे यापासून दूर दूर गेला. असा हा हाडाचा कलावंत लेखकाने नृत्यकलेतून मिथकरूपाने चित्रित केला आहे.

आदिवासी समाज निसर्गाच्या सान्निध्यात राहतो. शेती करून आपला उदरनिर्वाह करतो. त्याला जोडधंदा म्हणून गुरे पाळतो. रानातून या गुराढोरांच्या मागे फिरताना करमणूक म्हणून बासरी, पवा वाजवून गाणी म्हणत असतो. त्याला रानातील झाडाझुडपे, वृक्षवेली, पशुपक्षी, यांची ओळख होते. जंगलातील अनेक वनऔषधी त्यांना माहीत आहेत. वर्षानुवर्षाच्या अनुभवातून ऋतूचक्रांच्या बदलांविषयीचा अंदाज त्यांना माहीत असतो. या अनुषंगाने संजय लोहकरे यांच्या 'राब' कथासंग्रहातील 'गायखा' या कथेमधून वाद्यकलेविषयीचे मिथक योजले आहे.

'गायखा' या कथेमधून संजय लोहकरे यांनी तुक्या गायख्याची पवा वाजविण्याची कला आधारेखित केली आहे. तुक्या गायखा निवांत क्षणी दुपारच्या वेळी गायींच्या मागे पवा वाजवायचा. तेव्हा त्याचा लहान मुलगा म्हणजे शिद्या मन लावून ऐकायचा आणि एकाग्र मनाने पहायचा. मग शिद्याने ही पवा वाजवण्याची कला आपल्या वडिलांकडून अवगत केली. त्या कलेत तो अतिशय निष्णात झाला. शिद्या पवा वाजवून गायांना रानात चरायला जायचा इशारा करीत असे. दुपार झाली की पाण्यावर पाणी पियाला जायचा इशारा पवा वाजवून करीत असे. दिवस मावळायला गेला की शिद्याचा पवा ऐकून गायी गडदीकं निघत असत. शिद्या पवा वाजवून

तऱ्हातऱ्हाची गाणी लय सहज वाजवित असे. रानातल्या समद्या जनावरांचं आणि पाखरा-भ्याकरांचं आवाज शिद्या पत्र्यावं काढीत असे. इतकेच नव्हे तर "तो पवा वाजवायला लागला तं आख्या रानाची पाखरा तेंची च्याच-च्याव बंद करून गाणी ऐकंत्यात. ससं, हारणा तेंच्या बसेल जाग्यावरून हालत नहीत. ध्यान देऊन ऐकंत्यात. आखा रान त्याचा पवा ऐकून याडा होताय."[१५](पृष्ठ १०१) इतकी अप्रतिम कला अशिक्षित शिद्याने अवगत केली आहे. लेखकाने या कथेतून वाद्यकलेचे अप्रतिम मिथक योजले आहे.

संजय लोहकरे यांच्या 'राब' कथासंग्रहातील 'ढोल' या कथेमधून वाद्यकलेविषयीचे आणखी एक अप्रतिम मिथक योजले आहे. आदिवासी समाजातील लोक कामधंद्यासाठी, मोलमजूरीकरिता बाहेर गावी गेलेले असतात. पण सण उत्सवाच्यावेळी अवर्जून आपआपल्या गावी येत असतात. या कथेतील आमश्या ढोल्या होळीच्या सणानिमित्ताने आपल्या बायकोपोरांसह गावी येतो. होळीच्या दिवशी ढोल काढून होळीच्या माळावर जातो. ढोल बेचक्यात अडकवून हळूहळू ढोलाला नादवायला सुरूवात करतो. तो ढोल वाजवण्यात पटाईत आहे. त्याला या वाद्यकलेमुळे सर्वजण आमश्या ढोल्या म्हणून ओळखतात. तो या आख्या प्रदेशात ढोल वाजविण्यात पटाईत आहे. आमश्याची याकदा का ढोलावं थाप पडली का वाड्यापाड्यावरची माणसा नाचत नाचतच ढोलाच्या दिशेने यायची. एखादी सासूरवशीन भाकरी करीत असली की ढोलाच्या तालावंच तिचा हात काठवठीत नाचायचा. प्वारा स्वारा जेवत असली की मोठ मोठे घास घेऊन ढोलाकं पळत सुटायची. रातभर ढोल वाजवूनय आमश्या ढोल्या कधी दमायचा नाही. आमश्याला ढोलाची लय माहिती. नया ढोलाला कंचा लाकूड वापरायचा? ते कुठे मिळेल? त्याला कोणत्या जनवाराच्या कातड्याचा पान लावायचा? तो आवळायचा कसा? आखा डांगाण म्हणायचा की, "ह्या रानाना ढोल बनवाया आन् त्याचा आवाज आख्या रानात घुमवायाच आमश्याला जलमाला घातलाय"[१६](पृष्ठ ५३)

या कलेत आदिवासी आपले तन मन धन अर्पण करून तल्लीन होतात. प्रसंगी आपल्या जीवाची बाजी लावतात. आमश्या ढोल्याने हाळीच्या दिवशी होळीच्या माळावं ढोल वाजवायला सुरूवात केली. यावेळी आपल्या भोवती किती जण नाचतात याचे त्याला काही घेणे देणे नव्हते. गावातील सगळी लहान-थोर ढोलाच्या तालावं होळी भोवती नाचत होती. आखी रात आमश्या न थकता ढोल वाजवत होता. सर्वजण नाचत होते. उजेड येता-येता आमश्याची ढोलावरची थाप थांबली. कधीच न थांबणारी ढोलावरची थाप अशी एकदम का थांबली म्हणून नाचणारे सर्वजण पाहू लागले. तेव्हा आमश्या ढोलाच्या आधारानं स्वत:ला सावरत खाली मातीवं पडला होता. त्याचा श्वास बंद झाला होता.

अशी आदिवासी समाजात कलेला वाहून घेणारी रत्ने जन्माला आलेली असतात. ती त्या कलेमध्ये इतकी रमून जातात की स्वत:च्या प्राणाचीही बाजी लावायला ते मागे पुढे पाहात नाहीत. या जातकुळीतीलच हा आमश्या ढोल्या आहे. निसर्गाच्या सान्निध्यातच त्यांच्या व्यक्तिमत्वाची जडणघडण झालेली असते. असे समर्पक मिथक लेखकाने या कथेतून उभे केले आहे.

**७. डोंगर आणि निसर्ग संपत्तीविषयक मिथक:-**

आदिवासी समाजात निसर्गाला अतिशय महत्त्व आहे. निसर्गातील डोंगर, पशुपक्षी, वृक्ष वेली ही त्यांची दैवते आहेत. आदिमानवाच्या निर्मितीपासूनच त्यांनी श्रध्देने पूजलेली आहेत. त्यात कुठेही कर्मकांड नाही, थोतांड नाही की कसली अंध्दश्रध्द नाही. आदिवासींचे

जीवन हे सर्वशक्तीमान निसर्गावरच अवलंबून असल्याने त्याला संतुष्ट ठेवणे ही आदिवासींची महत्त्वाची धारणा आहे. आदिवासी गरीब असले, अज्ञानी असले तरी ते जंगलाच्या सान्निध्यात आहे त्या परिस्थितीत अत्यंत आनंदाने जगतात. आदिम संस्कृतीचे वेगळेपण म्हणजे निसर्गातील डोंगरदऱ्या आणि त्याभोवतीचे नैसर्गिक वातावरण आहे. या डोंगरांची नाळ आदिम काळापासून आपल्या पूर्वजांशी आहे. किंबहुना तो डोंगर म्हणजे आपल्या पूर्वजांचा बाप आहे. आदिवासी समाजाच्या निसर्गाप्रती असलेल्या आदिम श्रध्दा व रूढींच्या प्रभावातून हे मिथक निर्माण झाले आहे.

संजय लोहकरे यांच्या 'राब' कथासंग्रहातील 'सेटलमेंट' या कथेमधून सह्याद्री पर्वतरांगांमधील डोंगर म्हणजे आपल्या कैक पिढ्यांचे पोशिंदे आहेत. याच पर्वत रांगांमधील वारंघुशीच्या उशाचा बैलदेव डोंगर, मान्हेऱ्याच्या डोक्यावरला आक्राळविक्राळ राया डोंगर, शेणीतचा महाकाळ डोंगर, पटटा किल्ला,सोमठाण्या, चेमदेव या डोंगर रांगांना येथील आदिवासींनी आपले मायबाप म्हणून जपले आहे. तेच आपले पोशिंदे आहेत म्हणून आपण त्यांचे संरक्षण आणि संवर्धन केले पाहिजे. कारण हे डोंगर येथील आदिवासी आणि या निसर्गातील प्राणी, पशुपक्षी यांचे पोशिंदे आहेत. आदिवासींच्या अनेक पिढ्यांना या डोंगरांनी जगवल्या, वाढवल्या आहेत. पण आज त्यांच्याच लेकरांनी त्यांच्या पोटात खंजिर खुपसले आहे. या डोंगरातील समृध्द निसर्ग येथील ढोंगी, स्वार्थी पुढाऱ्यांनी राजकारण्यांच्या मदतीने अमाप पैसा घेऊन ठेकेदारांच्या घशात घालण्याचे काम चालवले आहे. त्यामुळे येथील आदिवासी उघडा पडला, उद्ध्वस्त झाला आहे. हे विनाशकारक चक्र इथेच थांबत नाही तर संपूर्ण निसर्गातील प्राणीसृष्टी, पशुपक्षी, झाडेझुडपे, वृक्षवेली, वनऔषधी वनस्पती नष्ट झाल्या आहेत. याचे विदारक चित्र लेखकाने या मिथकातून नियत केले आहे.

डांगाणातील आदिवासींच्या नकळत येथील आमदार-खासदारांनी मुंबईच्या साहेबांना हे निसर्गाने समृध्द डोंगर विकले आहेत. अर्थात या गोष्टीला स्थानिक स्वार्थी गावपुढाऱ्यांची साथ आहे. शेणीतच्या राया डोंगराच्या पायथ्याला मोठ मोठया मशिनी आल्या, जेसीबी आलं. त्यांनी राया डोंगर खणायला सुरूवात केली. राया डोंगर म्हणजे लय उंच डोंगर. या डोंगराच्या तिन्ही बाजूनी कातळ कडा. आखा डोंगर झाडाझुडपांनी भरलेला आहे. या डोंगराच्या पायथ्याला आंब्याच्या राई आणि वर नुसता हिरडीचा रान. या डोंगराच्या तिसऱ्या माचीला लय जाळी गुरफाटेल. पायरा, पिपरा, उंबरा आणि वर उंच कडा. कडेच्या वर नुसता कारईचा रान. आखा डोंगर हिरवागार आहे. माणसाली वर जाया मार्ग नाही का गुराढोरांना पायवाट नाही. आखा रान झाडाझुडपांनी गुरफाटेल. या डोंगराना लय पाखरा, भेकरा, वांदरा, रानडुकरा आणि गडदीत वाघ कायम बसेल. असे या डोंगरांचे सृष्टीसौंदर्य फळा -फुलांनी सजलेला दिसतो आहे. रानमेव्याचा तर कायम सुकाळ असतो. या सगळ्या डोंगरांवर औषधी वनस्पतींची जणू खाणच आहे. या डोंगरांनी लय मोहळा आणि मोहरी राहतात. अशा या निसर्ग समृध्दतेने नटलेल्या राया डोंगराच्या पहिल्या माचीला रस्ता भिडला आसं. आखा रानच जेसीबीच्या घुरघुऱ्याना याडाबैरा झाला आसं. रान पाखरा चिवचिव करून आभाळात उडाली आसं. टिटवी रातन्दिवस टीवटीव करीत फिरत आसं. गाय, बैल रानात जायाला घाबरत असतं. आख्या राया डोंगराची दैना झाली आसं.

डांगाणातील अशा निसर्गसंपन्न डोंगररांगा आमदार-खासदारांच्या संगनमताने ठेकेदारांना विकून आदिवासींना उद्ध्वस्त करण्याचा घाटघातला होता. त्यांना आयुष्यातून कायमचे उठवले होते. या डोंगर रांगांमधील वनऔषधी

वनस्पती नष्ट झाल्या होत्या. या डोंगरांमधील प्राणी, पशुपक्षी, वृक्ष, वेली नष्ट होत होत्या. या डांगाणतील साधीभोळी अडाणी माणसे भयभीत झाली होती. त्यावेळी त्यांना आपण रस्ता बंद पाडू असा स्थानिक स्वार्थी, ढोंगी दौल्या पुढारी धीर देत होता. पण रस्ता आणखीनच वरवर चालला होता. रस्ता राया डोंगराच्या डोक्यावर गेला होता. तिथून महाकाळ डोंगरवर त्यांने हातपाय पसरले होते. मंग पट्टा किल्ला, चेमदेव डोंगर, सोमठाण्या डोंगरावरही रस्ता झाला. मंग कंपनींच्या गाड्यांची ये-जा सुरू झाली. वारंघुशीच्या बारही माळावरल्या सगळ्या भिंगऱ्या या सगळ्या डोंगरांवर नेऊन उभ्या केल्या. या भिंगऱ्या वारेच्या तालावं घुमत घुरघुर आवाज करीत होत्या. डांगाणातील आखी गावं डोळे उघडे ठेवून या सगळ्या डोंगरांकडे भयभित होऊन आणि डोळे फाडून पाहत होते. वारंघुशीच्या उशाचा बैलदेव डोंगर, मान्हेऱ्याच्या डोक्यावरला आक्राळविक्राळ राया डोंगर, शेणीतचा महाकाळ डोंगर, पटटा किल्ला, सोमदेव डोंगर, चेमदेव डोंगर या भिंगऱ्यांच्या आवाजात आवाज मिसळून रडत होते. या डोंगरांचे कण्हणे ऐकू येत होते. या डोंगरांचा आक्रोश, वेदना जाणवत होत्या. लेखकाने डोंगरांना जिवंत माणसाचे रूपक योजून अप्रतिम मिथक निर्मिती केली आहे.

**संदर्भ ग्रंथ:-**


१. डॉ. वरखेडे, रमेश-लोकसाहित्य: संशोधपध्दती, यशवंतराव चव्हाण महाराष्ट्रमुक्त विद्यापीठनाशिक-२२. प्रथम प्रकाशन: नोव्हे. २००२.

२. डॉ. आढळ, मारूती। आढळ, देवराम -(संपा.) फडकी (मासिक), १५ जानेवारी-फेब्रुवारी २०२०, अंक २-३.

३. डॉ. गारे, गोविंद-सह्याद्रीतील आदिवासी : महादेवकोळी, आदिम साहित्य प्रकाशन, पुणे- ४३, तृतीयावृत्ती : एप्रिल २००७.

४. लोहकरे, संजय-राब, अथर्व पब्लिकेशन धुळे -०१, प्रथमावृत्ती : ९ ऑगस्ट २०१८. ५. तैत्रव,

६. तैत्रव, ७. तैत्रव, ८. तैत्रव, ९. तैत्रव,

१०. तैत्रव, ११. तैत्रव, १२. तैत्रव, १३. तैत्रव

१४. तैत्रव

१५. तैत्रव

१६. तैत्रव

१७. डॉ. पगार, एकनाथ-लोकसाहित्य व आधुनिक साहित्य, यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ नाशिक-२२. प्रथम प्रकाशन: सप्टें. २००२.

१८. डॉ.आढळ, मारूती : आढळ, देवराम -(संपा.) फडकी (मासिक), १५ सप्टें.२०१९, अंक १०.

१९. डॉ. आढळ, मारूती : आढळ, देवराम -(संपा.) फडकी (मासिक), १५ डिसें. २०१९, अंक ०१.

२०. डॉ. आढळ, मारूती : आढळ, देवराम -(संपा.) फडकी (मासिक), १५ जून. २०१९, अंक ७.

२१. डॉ. लोहकरे, संजय -(संपा.) आदिवासी लोक साहित्य: शोध आणि बोध, मेधा पब्लिशिंग हाऊस, अमरावती -६, प्रथमावृत्ती ११ मे २०१४.

२२. डॉ. रोंगटे, तुकाराम -आदिवासी साहित्य : चिंतन आणि चिकित्सा, दिलीपराज प्रकाशन, प्रा. लि. पुणे-३०, प्रथमावृत्ती २६ जानेवारी२०१४.

२३. प्रा. डॉ. मांडे, प्रभाकर- लोकसाहित्याचे अंत:प्रवाह, गोदावरी प्रकाशन, औरंगाबाद- ०३, दुसरी आवृत्ती-फेब्रुवारी १९९७.

२४. डॉ. लोहकरे, संजय । गिळंदे, रामदास -(संपा.) विद्यापीठ अभ्यासक्रमातील आदिवासी साहित्य, मेधा पब्लिशिंग हाऊस, अमरावती-६, प्रथमावृत्ती १५ नोव्हेंबर२०१८.

२५. डॉ. गारे, गोविंद-स्वातंत्र्यलढ्यातील आदिवासी क्रांतीकारक, श्रीविद्या प्रकाशन, पुणे- ३०, प्रथमावृत्ती : ९ ऑगस्ट२००४.


****